**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

---

(Extra-ordinary)

Monday, the 11th November, 2024

**NOTIFICATION**

No. : 152 /2024. Date :- 11 /11/2024

**Subject : Absorption scheme for CBCS to NEP-2020 in the faculty of Commerce and Management for the Under graduate & Post graduate Programmes.**

\

It is notified for general information of all the concerned that the authorities of the University have approved the Absorption scheme for Under graduate & Post graduate students of CBCS in the faculty of Commerce and Management which is to be implemented from the Academic Session 2024-2025 as per the Appendix-A enclosed herewith.

Sd/-
(Dr.Avinash Asanare)
Registrar
Sant Gadge Baba Amravati University

**Appendix - A**

**Absorption scheme for CBCS to NEP-2020 in the faculty of Commerce and Manamgement for the Programme B.Com.**

**भाग - १**

जे विद्यार्थी बी. कॉम प्रथम वर्षाला शैक्षणिक सत्र २०२२-२३ ते २०२३-२४ C.B.C.S ला प्रवेशित झालेले आहेत. ज्यांनी सेमिस्टर १ आणि २ चे टर्म वर्क पूर्ण केलेले आहेत, पण पास किंवा नापास झालेले आहेत, असे विद्यार्थी शैक्षणिक सत्र २०२५-२६ व त्यानंतरच्या सत्रामध्ये NEP-२०२० द्वितीय वर्षास म्हणजेच सेमिस्टर ३ व ४ करीता प्रवेशास पात्र असतील. जसे :-

१. NEP-2020 मध्ये बी. कॉम द्वितीय वर्षाच्या सेमिस्टर ३ ला प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना एक विषय मेजर म्हणून निवडावा लागेल व उर्वरित विषय मायनर असतील.

२. CBCS Pattern मधील वी. कॉम प्रथम वर्षाचे सेमिस्टर १ आणि २ चे एकूण क्रेडीट्स हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील प्रथम वर्षाच्या सेमिस्टर १ आणि २ च्या क्रेडीटसला Match करतील.

३. NEP-2020 पॅटर्नमधील सेमिस्टर ३ ला प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याला सेमिस्टर १ मधील IKS दोन क्रेडीट्सची परिक्षा पास करावी लागेल म्हणजेच त्याला सेमिस्टर ५ ला प्रवेशापूर्वी IKS चे २ क्रेडीट्स मिळवावे लागतील.

**भाग - २**

जे विद्यार्थी सी.बी.सी.एस पॅटर्न मध्ये बी.कॉम द्वितीय वर्षाला सन **२०२३-२४** व **२०२४-२५** च्या दरम्यान प्रवेशित असतील ज्यांनी सी.वी. सी.बी.सी.एस पॅटर्न बी. कॉम सेमिस्टर १,२,३ आणि ४ चे टर्म वर्क पूर्ण केले असतील, किंवा पास /नापास झाले असतील, असे विद्यार्थी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-**२०२०** पॅटर्न मध्ये सेमिस्टर ५ ला शैक्षणिक सत्र **२०२६-२७** ला व त्यापुढे प्रवेशास पात्र असतील. जसे : -

**१.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **२०२०** मध्ये बी. कॉम तृतीय वर्षाच्या सेमिस्टर ५ ला प्रवेश घेतांना १ एक विषय मेजर म्हणून निवडावा लागेल व उर्वरित विषय हे मायनर असतील.

**२.** सी.बी.सी.एस पॅटर्न मधील बी. कॉम सेमिस्टर **१.२.३** आणि ४ चे एकूण क्रेडीट्स राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-**२०२०** मधील बी. कॉम सेमिस्टर १,२,३ आणि ४ चे एकूण क्रेडीट्स सोबत Match करतील.

**३.**NEP-2020 पॅटर्नमधील सेमिस्टर ५ ला प्रवेश घेतल्यानंतर विद्यार्थ्याला सेमिस्टर १ मधील IKS दोन क्रेडीट्सची परीक्षा पास करावी लागेल म्हणजेच त्याला सेमिस्टर ५ व ६ मध्ये असतानी IKS चे २ क्रेडीट्स मिळवावे लागतील, त्याशिवाय सेमिस्टर ६ चा निकाल घोषित केला जाणार नाही.

**४.** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-**२०२०** मधील बी. कॉम सेमिस्टर ६ ची परीक्षा देण्यापूर्वी विद्यार्थ्याला व्हर्टीकल एफ मधील OJT/Internship/Apprenticeship/ Field Project and CEP and C. C चे क्रेडीट्स पूर्ण करावे लागतील, त्याशिवाय सेमिस्टर ६ चा निकाल घोषीत केला जाणार नाही.

टिपः- हीच स्कीम बी. कॉम. (Accounting and Finance) ला प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता सुध्दा लागू राहील.

Absorption scheme for CBCS to NEP-2020 in the faculty of Commerce and Management for the programme M.Com.

जे विद्यार्थी एम.कॉम सी.बी.सी.एस पॅटर्नला शैक्षणिक सत्र **२०२१-२२** व **२०२२-२३** दरम्यान प्रवेशित होते. ज्यांनी एम. कॉम प्रथम वर्षाचे म्हणजेच सेमिस्टर १ व २ चे टर्म वर्क पूर्ण केले असेल किवा ते पास/नापास झाले असतील अशा विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - **२०२०** एम. कॉम द्वितिय वर्षाला म्हणजेच सेमिस्टर ३ ला शैक्षणिक सत्र **२०२४-२५** या वर्षामध्ये व त्यापुढे प्रवेशास पात्र असतील, जसे :-

**१.** एम. कॉम सेमिस्टर १ व २ सी.बी.सी.एस पॅटर्न मधील प्राप्त केलेले **४०** क्रेडीटस हे एम. कॉम सेमिस्टर १ व २ राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- **२०२०** पॅटर्न मध्ये Count केले जातील. मात्र विद्यार्थ्याला राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- **२०२०** पॅटर्नच्या एम. कॉम सेमिस्टर ३ ला प्रवेश घेतल्यानंतर सेमिस्टर ४ च्या परीक्षेपूर्वी अतिरिक्त **४** क्रेडीट्स OJT / Field Project च्या माध्यमातून पूर्ण करावे लागतील.